साप्ताहिक
# परळी परिसर
Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25
✻ परळी वैजनाथ ✻ सोमवार, दि. २८ एप्रिल २०२५ ✻ पाने-४ ✻ २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## परळी शहरातील मुख्य रस्ते अद्ययावत अशा 'कोणकिल' पोल व त्यावरील एलईडी दिव्यांनी चकाकणार; शहराच्या सौंदर्यात पडणार भर

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी शहरातील प्रमुख रस्ते अद्ययावत अशा कोणकिल पोल व त्यावरील एलईडी दिव्यांनी चकाकणार आहेत. यामुळे शहराच्या वैभवात व सौंदर्यात भर पडणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत मिळालेल्या दहा कोटी रूपयांच्या निधीतून हे पोल व दिवे शहरात लावण्यात येत आहेत. सध्या शहरातील मुख्य मार्गावरील रस्त्यावर कोणकिल पोल लावण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. परळी पालिकेमार्फत हे काम करण्यात येत



असून शहरातील वीस मुख्य रस्त्यावर हे पोल लावले जाणार आहेत. हे पोल वजनाने हलके असले तरी ते मजबुत आहेत. या पोलवर एलईडी दिवे असणार आहेत. या दिव्यांचा प्रकार पिवळा असून यामुळे उर्जेची बचत होण्याबरोबरच पिवळ्या प्रकाशामुळे रस्ते उजळून निघणार आहेत. हे पोल हवामान बदलास झेपणारे असून त्यांना गंज लागणार नाही. या पोलमध्ये विशिष्ट प्रकारचे स्टील वापरले गेले आहे. शहरातील मुख्य वीस रस्त्यावर सुमारे ६६६ पोल लावण्यात येणार आहेत. या पोलची रचना जुन्या काळातील महल, राजवाड्यातील दिव्यांच्या खांबासारखी आहे. मुख्य रस्त्यावर या पोलची उभारणी झाल्यानंतर जुने विद्युत पोल काढले जाणार आहेत. दरम्यान, जुने पोल व त्यावरील दिवे शहरातील नव्या भागात लावली जावीत, ज्या भागातील पथदिवे बंद आहेत, तिथे त्यांचा वापर व्हावा अशी मागणी नागरिकांतून होत आहे. दहा कोटी रूपये खर्च करून हे दिवे शहरात लावले जात आहे. दिव्यांवर एवढ्या मोठा खर्च शासनाकडून होत आहे. त्यामुळे हे पोल उभारणीचे काम दर्जेदार व्हावे अशी मागणीही नागरिक करत आहेत.

## विवेक जॉन्सन यांनी स्विकारला बीड जिल्हाधिकारी पदाचा पदभार




बीड, (जि.मा.का.) : बीड जिल्हयाचे जिल्हाधिकारी म्हणून विवेक जान्सन यांनी नुकताच पदभार स्विकारला. श्री जॉन्सन २०१८ च्या तुकडीचे सनदी अधिकारी आहेत. येथे बदलून येण्यापूर्वी ते चंद्रपूर येथील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते.

अभियंता पदवी नंतर ते प्रशासकीय सेवेत आहेत. त्यांनी परिविक्षाधिन कालावधीत येथील माजलगाव नगर परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर काम केलेले आहे. त्यांनी पदभार स्विकारल्यावर निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी त्यांचे प्रशासनातर्फे स्वागत केले. यावेळी महसूल विभागाचे अधिकारी तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी तसेच इतरांची उपस्थिती होती.

**अल्पपरिचय :-** ✻ पलक्कड येथील एनएसएस महाविद्यालयातून यांत्रिकी अभियंता परिक्षा उत्तीर्ण ✻ २०१६ साली भारतीय महसूल सेवा (आयआरएस) व नंतर २०१८ साली भारतीय प्रशासन सेवेत रुजू ✻ स्मार्ट आरोग्य केंद्र उभारणीत एकूण ३२ आरोग्य केंद्र अद्यावत केले. ✻ मिशन 'सक्षम'अंतर्गत खगोल प्रयोगशाळा तसेच ८ विज्ञान उद्यानांची उभारणी ✻ जिवनोन्नती अंतर्गत बचतगटांसाठी १० विशेष मॉलची उभारणी ✻ ग्रामसडक अंतर्गत ५००० किमी रस्ते बांधणी ✻ ग्रामीण भागात पर्यटन विकास कार्य तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेस गती देण्यासाठी १६ कृषी माल गोदामांची उभारणी

**पुरस्कार :-**
✻ उल्लेखनीय कार्याबद्दल शासनाच्या बालस्नेही पुरस्काराचे मानकरी
✻ लोकाभिमुख कार्याबद्दल 'महाराष्ट्रीयन ऑफ द इअर २०२३' पुरस्काराने गौरव
✻ ग्रामीण जीवनात, अर्थव्यवस्था आणि मुलभूत सुविधा उभारणीसाठी 'स्कॉच पुरस्कार'


## न्युज पेपर असोसिएशनच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी के.डी.चंडोला तर महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी प्रदीप कुलकर्णी यांची फेर निवड



जयपुर (विशेष बातमीदार):- असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया या संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी के.डी.चंडोला यांची तर महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी प्रदीप कुलकर्णी यांची फेर निवड करण्यात आली आहे.

या संघटनेचे राष्ट्रीय अधिवेशन २६ एप्रिलपासून राजस्थानच्या जयपूर शहरात सुरू आहे. या अधिवेशनामध्ये राजस्थान अध्यक्ष गोपाल गुप्ता यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर राष्ट्रीय महासचिव शंकर कटीरा यांनी बैठकीत मार्गदर्शन केले. राष्ट्रीय अध्यक्ष के.डी.चंडोला यांनी नंतर बैठकीची सूत्रे हाती घेतल्यानंतर देशभरातील विविध राज्यांच्या राज्याध्यक्ष पदाच्या निवडी जाहीर केल्या. यामध्ये महाराष्ट्राच्या राज्याध्यक्षपदी प्रदीप कुलकर्णी यांची फेर निवड करण्यात आल्याची घोषणा त्यांनी केली. दरम्यान, अधिवेशनाच्या प्रारंभी संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी के.डी.चंडोला यांची फेर निवड करण्यात आली.

यावेळी अधिवेशनास उपस्थित असलेल्या महाराष्ट्रातील सर्व सदस्यांनी टाळ्याच्या गजरात श्री चंडोला व श्री कुलकर्णी यांच्या निवडणीचे स्वागत केले. या समारोप प्रसंगी श्री छाबडा, डॉ. अमृता मौर्य यांची समायोजित भाषणे झाले. राष्ट्रीय कार्यकारिणी व राष्ट्रीय कार्यकारणीतील इतर सदस्यांची घोषणा येत्या आठवड्याभरात करण्यात येईल असे यावेळी श्री चंडोला यांनी सांगितले.✻






## परळीतील गोवंश तस्करी ही संघटित गुन्हेगारी; गोमातांवरील विषप्रयोग प्रकरणी 'मक्कोका' लावा

परळी वैजनाथ, (बातमीदार):- गेल्या अनेक वर्षापासून परळी व परिसरात गोवंश तस्करीच्या बाबतीत संघटितपणाने अवैधरित्या हा व्यवसाय करणारी संघटित गुन्हेगारी टोळी सक्रिय असुन गोरक्षण सेवा संघाने,गोरक्षकांनी वेळोवेळी सातत्याने, वारंवार पोलीस व संबंधित सर्व प्रशासनाला याबाबत पाठपुरावा केलेला आहे. मात्र ही गुन्हेगारी मोडीत निघाली नाही. दि.२५ रोजी तर परळीत गोमातांवर विषप्रयोग करून त्यांची तस्करी करण्याचा अघोरी प्रकार घडला. याप्रकरणी पोलिसांनी अनोळखी इसमांवर गुन्हा दाखल केला असला तरी आरोपींना अटक झालेली नाही.या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन याप्रकरणी मक्कोका लावण्याची मागणी गोरक्षण सेवा संघाने केली आहे.



याबाबत परळी शहर पोलीस ठाण्यात आज गोरक्षण सेवा संघ महाराष्ट्र ने निवेदन दिले असून या निवेदनाद्वारे गोमातांवरील विष प्रयोग प्रकरणी आरोपीविरुद्ध मक्कोका लावावा, तातडीने या प्रकरणातील आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी केली आहे. गाईंना डांबून नेणे, गोवंशाची अवैधरीत्या तस्करी करणे आदी

(उर्वरित पान ४ वर)

# धर्मापुरीच्या जिजामाता विद्यालयास 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' योजनेचे पारितोषिक

परळी वैजनाथ, (बातमीदार):-इंद्रायणी प्रतिष्ठाण संचलित जिजामाता विद्यालय धर्मापुरी या शाळेला मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमा अंतर्गत रुपये एक लाखाचे नगदी रोख पारितोषिक मिळाले. या शाळेचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. शासनाच्या शिक्षण उपक्रमांतर्गत सन २०२४ - २५ या शै . वर्षात जिजामाता विद्यालयाने सहभाग नोंदविला होता. या विद्यालयाला तृतीय क्रमांकाचे रू. १ लाखाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. वर्षभर शाळेमध्ये विविध कार्यक्रम - उपक्रम राबविण्या त आले . सुंदर परस बागेची निर्मिती, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा, शाळा परिसर स्वच्छता, गावातील रस्ते स्वच्छता अभियान, सुलभ प्रवेश प्रक्रिया, आरोग्य तपासणी, प्रबोधन कार्यक्रम, तक्रार पेटी ,पुस्तक पेढी, स्पर्धा परीक्षा, शासनाच्या विविध योजना, विज्ञान प्रयोग शाळा, सी सी टीव्ही कॅमेरे, स्वच्छता गृह यांसह शासन परिपत्रकानुसार सर्व बाबींची पूर्तता उस्फुर्तपणे करण्यात आली . प्राचार्य रामहरी गिते यांच्या कुशल मार्गदर्शन व



* सन २०२४ - २५ मध्ये राबविले विविध उपक्रम
* प्राचार्य आर.एस. गिते यांचे उत्कृष्ट नियोजन
* संस्था पदाधिकाऱ्यांची खंबीर साथ
* सुंदर परसबाग, सांस्कृतिक, क्रीडा, परिसर स्वच्छता, आदिंची पूर्तता
* तृतीय क्रमाकांचे रु.१ लाखाचे मिळविले बक्षीस

उत्कृष्ट नियोजनानुसार शाळेतील प्राध्यापक वृंद, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी एवढेच नव्हे तर परिवहन व्यवस्था सांभाळणारे ॲटो चालक, पोषण आहार कामगार, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ यांचे दैदिप्यमान सहकार्य तसेच संस्था पदाधिकारी यांची खंबीर साथ आदिं बाबीं मुळे विद्यालयाला हे यश मिळविता आले. गटसाधन केंद्राचे श्री बालासाहेब दहिफळे यांच्या हस्ते एका कार्यक्रमात हा धनादेश प्राचार्य गिते यांना प्रदान करण्यात आला . यावेळी

पर्यवेक्षक बी. टी आघाव, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक हणुमंत कराड, संजय फड यांची उपस्थिती होती

विद्यालयाच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे सचिव विजय कुमार नागरगोजे, संचालिका डॉ सौ . सरस्वती नागरगोजे व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. ***

# श्री सोमनाथ ज्योतिर्लिंग रुद्रपूजा आणि दर्शन सोहळा संपन्न



परळी वैजनाथ, (बातमीदार):- १८ एप्रिल २०२५ रोजी पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ नागरी येथे विश्व शांतीदूत आध्यात्मिक गुरू परम पूज्य श्री श्री रविशंकरजी (गुरुदेव) ह्यांच्या मार्गदर्शना खाली श्री सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे आगमन झाले. १००० वर्षान आधी परकीय आक्रमणकारी मोहम्मद गझनीने १७ वेळा आक्रमण करून प्रचंड धनसंपदा लुटली, आणि सत्ययुगीन श्री सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे तुकडे करून मंदिर उध्वस्त केले, त्यावेळी तेथे उपस्थित असणाऱ्या काही अग्निहोत्री ब्राह्मणांनी शिवलिंगाचे अवशेष घेऊन दक्षिण भारतात नेले तिथे गुप्तपणे अवशेषांना लिंगाकार देऊन जतन आणि साधना केली.

साधारण १०० वर्ष आधी १९२४ मध्ये कांची चे शंकराचार्य ह्यांच्या मार्गदर्शना नुसार श्री राम मंदिराची अयोध्येत स्थापना झाल्यावर दक्षिणेतील संत शंकराचे नाम धारण केलेले परम पूज्य श्री श्री रविशंकरजी ह्यांचे कडे जानेवारी २०२५ ला सुपुर्त करण्यात आले.

असे दिव्य सोमनाथ ज्योतिर्लिंग परम पूज्य श्री श्री रविशंकरजी गुरुदेव ह्याचे शिष्य श्री दर्शकजी हाथी ह्यांच्या उपस्थिती मध्ये परळी वैजनाथ मंदिर देवस्थान येत अदभुत अशी रुद्राभिषेक केला आणि साधक भक्तांना दर्शनाचा लाभ मिळाला.मोठ्या संख्येने शिवभक्त दर्शनासाठी उपस्थित होते. ह्या ज्योतिर्लिंगाचे सोमनाथ मंदिर गुजरात येथे पुनः स्थापना करण्यात येईल. ह्या कार्यक्रमासाठी आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेचे साधक व कार्यकर्ते टीचर श्री शिरीष भैया चौधरी सुदाम कापसे सर वशिष्ठ कुकडे राठोड सर मंगल ताई मुंडे रेखाताई धुमाळ रोहिणी गीते रोहिणीताई चौधरी कुमारी मधुरा ईटके श्रीनिवास पत्की डीडीसी मेंबर महादेव इटके , योगेश भैय्या मेनकुदले, श्री.राहुलजी सामत, श्री. मुकेशजी भुतडा अनुप भन्साळी शिवलकर भैया गिरधारी बालदी ह्यांनी विशेष मेहनत घेतली .कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन आर्ट ऑफ लिव्हिंग परळी माहिती केंद्राचे सर्व प्रशिक्षक, स्वयंसेवक, साधक ह्यांनी उस्फुर्त पणे केले.

कार्यकमाचा समारोप श्री. कैलाशजी तांदळे ह्यांनी सर्वांचे आभार प्रदर्शन करून व प्रसाद वाटप करून झाला. ***

# न्यू हायस्कूलमधून शिक्षण घेतलेल्या अक्षय मुंडे याने युपीएससी परीक्षेत मिळवले मोठे यश

## देशातून ६९९ वी रँक मिळवत आईचे स्वप्न केले पूर्ण

परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील उर्जानगर वसाहतीतील न्यू हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालयातून शिक्षण घेतलेल्या तालुक्यातील पांगरी येथील अक्षय संभाजी मुंडे याने युपीएससीच्या परीक्षेत मोठे यश संपादन करून न्यू हायस्कूल व परळी तालुक्याचे नाव शिक्षण क्षेत्रात उंचावले आहे.

मंगळवारी (दि.२२) यूपीएससी परीक्षेचा निकाल जाहीर झाला आणि परळी तालुक्यातील पांगरी च्या अक्षय मुंडे चे नाव यूपीएससीची च्या यादीत झळकले. आईने पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्याच्या जिद्दीने अक्षय ने प्रचंड मेहनत घेत हे यश संपादन केले आहे.

वास्तविक पाहता अक्षय च्या घरची परिस्थिती अत्यंत बेताची.त्यात वडिलांचे छत्र बालपणीच हरवलेले अशा प्रतिकुल परिस्थितीत परळी तालुक्यातील पांगरी चा अक्षय संभाजी मुंडे हा गावातील भगवानबाबा विद्यालयातून दहावी उत्तीर्ण झाला. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी त्याने परळीच्या न्यू हायस्कूल व उच्च मा.विद्यालय येथे प्रवेश घेतला. २०१२ मध्ये बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर त्याने लातूर येथील एमआयटी कॉलेजमध्ये बीडीएस साठी प्रवेश घेतला.

बीडीएस ही वैद्यकीय शाखेची पदवी घेऊन तो डॉक्टर झाला होता तरीपण त्याचे मन मात्र हया क्षेत्रात अजिबात रमत नव्हते. आपण काहीतरी वेगळे करून दाखवावे ही भावना त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. आपल्या आईने आपल्यासाठी जे कष्ट उपसले त्या कष्टांचं चीज करायचं असेल तर आपण याहीपेक्षा एखादे मोठे यश मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे या विचाराने त्याने थेट पुणे गाठले. तेथे जाऊन त्याने स्पर्धा परीक्षांसाठी तयारी सुरू केली. पुणे येथून दोन वर्षांपूर्वी तो नवी दिल्ली येथे गेला व स्पर्धा परीक्षांसाठी



त्या ठिकाणी योग्य असे मार्गदर्शन मिळवत त्याने प्रचंड मेहनत सुरू ठेवली.

अक्षयला अक्षता नावाची एक विवाहित बहीण असून त्याची आई आजही शेतामध्ये काम करते. पतीच्या निधनानंतर अत्यंत बिकट अशा परिस्थितीत त्या माऊलीने अक्षयला शिक्षणासाठी लातूर असो, पुणे असो की दिल्ली असो कुठेही मागे वळून पाहू दिले नाही. आईचे प्रचंड कष्ट,बहिणीची साथ आणि त्या दोघींनी त्याच्यासाठी साठी पाहिलेले स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी अक्षयने दिवस रात्र एक केले. अभ्यासाव्यतिरिक्त त्याने बाकी सर्व अनावश्यक गोष्टी बाजूला ठेवल्या आणि त्यामुळेच मुंडे कुटुंबाला आणि पांगरी गावाला आजचा हा भाग्याचा दिवस पाहण्याचा योग आला.

देशातील अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या यूपीएससीच्या परीक्षेत त्याने ६९९ वी रँक मिळवत विजयाची माळ खेचून आणली. त्याच्या ह्या उत्तुंग यशाबद्दल त्याचे कुटुंबीय, मित्रपरिवार, गावकरी, नातेवाईक,तसेच त्याला मार्गदर्शन करणारे शिक्षकवृंद या सर्वांनी मनापासून आनंद व्यक्त केला आहे. तसेच त्याला पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

तसेच मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाशदादा सोळंके, सचिव आ.सतीशभाऊ चव्हाण, कार्यकारणीचे सर्व सदस्य, शालेय समितीचे अध्यक्ष नानासाहेब सोळंके काका, इतर सर्व सदस्य, प्राचार्य एस.पी.देशमुख, उपप्राचार्य सुनील लोमटे, पर्यवेक्षक बालासाहेब राठोड यांच्यासह शिक्षक, प्राध्यापकवृंदांनी अक्षय मुंडे याचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.*

(पान १ वरुन)..............**गोमातांवरी विषप्रयोग प्रकरणी मक्कोका**

नेहमीचेच प्रकार परळी व परिसरात घडतात. याबाबत गोरक्षकांच्या वतीने वारंवार पोलिसांना व संबंधित प्रशासनाला निवेदने दिलेली आहेत. तसेच या प्रश्नावर परळीतील गोरक्षकांच्या वतीने बेमुदत उपोषणही करण्यात आले होते. हे उपोषण सोडवताना जी आश्वासने दिली ती आश्वासने ही प्रशासनाने पूर्णतः पूर्ण केलेली नाहीत. त्याचबरोबर परळी शहरात मोकाट जनावरांसाठीचा कोंडवाडा निर्माण करण्याचे आश्वासन परळी नगर परिषदेने दिले होते.परंतु अद्यापही परळीत कोंडवाडा निर्माण झालेला नाही. मोकाट जनावरांची, त्यातही गोवंशाची गुंगीची औषधे देऊन तस्करी करण्याचा अघोरी प्रकार धडधडीत उघडकीस आलेला आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल झालेला असला तरी आरोपी आणि या संबंधित गुन्हेगारी टोळीचा पर्दाफाश करण्याच्या दृष्टीने पोलिसांनी कोणताही तपास केलेला नाही. विषप्रयोग प्रकरणी आरोपींना तात्काळ अटक करावी तसेच गोमातांवर विष प्रयोग करण्याच्या या प्रकरणात आरोपी विरुद्ध मक्कोका कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करावा अशी मागणी महाराष्ट्र गोरक्षक संघाच्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी मोठ्या संख्येने गोरक्षक, नागरिक उपस्थित होते. ***

# परळी तालुक्यात १ ते ९ मे फिरत्या श्रामणेर शिबिराचे आयोजन

परळी वैजनाथ, (बातमीदार):- महाबोधी बहुउद्देशिय संस्था व नालंदा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने फिरते ९ दिवसीय श्रामणेर शिबिराचे १ मे ते ९ मे दरम्यान आयोजन करण्यात आले असुन या श्रामणेर शिबिरात सहभागी होण्यासाठी त्वरित नोंदणी करावी अशी नम्र आवाहन आयोजिका तथा उपासिका सिमाताई कांबळे यांनी केले आहे.

जगाच्या पाठीवर एकमेव धम्म आहे कि शांती,दया,माया प्रस्थापित करतो. तो धम्म म्हणजे भारतातील तथागत गौतम बुध्दांचा बौद्ध धम्म आहे.पवित्र अश्या धम्मात श्रामणेर होणे एक मोठे धम्म कार्य तर मानलेच जाते परंतु स्वताला स्वयम प्रकाशित करण्यासाठीचा मार्ग मानला जातो याच अनुशंगाने महाबोधी बहुउद्देशिय संस्था व नालंदा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने फिरते ९ दिवसीय श्रामणेर शिबिराचे १ मे ते ९ मे दरम्यान आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पू. भवन्त नागघोष महोथेरो (अध्यक्ष, म. बौ. संस्था)तर कार्यक्रमाचे उद्घाटक पू. भवन्त डॉ. हर्षबोधी महोथेरो (उपाध्यक्ष, म. बी. संस्था) यावेळी ध्वजारोहन पू. भवन्त चंद्रबोधी थेरो (दिल्ली)यांच्या हस्ते होईल व प्रमुख मार्गदर्शक पू. भवन्त धम्मदीप महाथेरो (अध्यक्ष, भिमजन्म भूमी मह) अदी या श्रामणेर शिबिराला मार्गदर्शन करण्याकरिता पू. भदन्त शिलरत्न थेरो (वटफळी)पू. भंते संघरत्न (औरंगाबाद)पू. भदन्त एस. राहुल (औरंगाबाद)पू. भंते महामोगल्यान (वटफळी)भदन्त अश्वघोष (वटफळी, वटफळा)पू. आर्याजी भिक्खुजी रुपनंदा (श्रीलंका रिटर्न)पू. भदन्त महामोगल्यान (परभणी) भिक्खु भिक्खुनी संघ उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.तरि या फिरते श्रामणेर शिबिर दि.१ मे भिमवाडी,दि.३ मे सारडगाव,दि.४ मे,दि.५ मे सिरसाळा ,दि. ६ मे वानटाकळी,दि.७ मे सोनपेठ,दि.८ मे,दि. ९ मे भिमवाडी परळी येथे शिबिराचे समारोप होणार आहे. या शिबिरात सहभागी होण्यासाठी नोंदणीअवश्यक आहे. संयोजक व संपर्क धम्मसेविका उपा. सिमाताई कांबळे ८४५९०३८०८१, महेंद्र रोडे मो.९७६४०८११११,यशपाल मुंडे मो. ९८५०४२९९९७,मोहन व्हावळे ९८८१२६५१०२ यावर संपर्क साधून नोंदणी करावी असे आवाहन केले आहे.

***

**संपादकीय...**

# उत्पादनावरच बंदी हवी...!

**✻ सुविचार ✻**
**उन्हात चालताना सावलीची गरज असते,**
**तसे जीवन जगताना चांगल्या माणसांची गरज असते..!**


एकेकाळी परळीच्या श्री बाबू आवचारे यांनी 'हालगी' या पारंपरिक वाद्य वाजवण्याच्या क्षेत्रात मराठवाड्यातच नव्हे तर महाराष्ट्रात नाव लौकिक मिळवला होता. श्री आवचारे यांना हालगी वादनाचे सुमारे ५१ प्रकार ज्ञात होते. एखाद्या कार्यक्रमात श्री आवचारे हालगी वाजऊ लागले की ऐकणारे, पाहणारे टक लाऊन पहात, कान देऊन ऐकत. श्री आवचारे हालगी वाजवायचे तेव्हा कुणी ताल धरत तर कुणी हालगी पुढे देहभान विसरून नाचत! एखाद्या कार्यक्रमात किंवा मिरवणुकीत अथवा लग्नाच्या वरातीत परळीच्या बाबू आवचारे यांचे हालगी वादन आहे म्हटल्यावर आबालवृद्ध यावेळी आवर्जून हजेरी लावायचे. वरातीत, मिरवणुकीपुढे श्री आवचारे यांच्या हालगीच्या तालावर सगळेकाही विसरून मनसोक्त नाचणाऱ्या युवकांची संख्या मोठी असायची. ही आठवण करून देण्यामागे आमचा हा उद्देश की हालगी, बॅन्ड, सनई, चौघडे, पिपाण्या, तुतारी आदी पारंपरिक व महाराष्ट्राचे भूषण असणारी वाद्य व ते वाजवणारे आज कमी होत चालले आहेत. वाढदिवसापासून बारसे, लग्न समारंभ, लग्नाच्या वराती, महापुरूषांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या आदी कार्यक्रमात कानाचे पडदे आणि हृदयाचे ठोके चुकवणाऱ्या व माणसाचे शरीरच नाही तर मेंदूही बधीर करणाऱ्या तसेच परिसर हादरून, दणाणुन सोडणाऱ्या डीजेने या वाद्याची जागा घेतली आहे. डीजेचा आवाज किती असावा याबाबत शासन, कायदा यांनी मर्यादा घातलेली असतानाही कायदा व शासनाच्या नियमाला केराची टोपली दाखवत आज डीजे वाजवण्याची फॅशनच झाली आहे. अधिक मोठा व परिसर हादरून व दणाणुन सोडणाऱ्या मोठ्या आवाजाचे डीजे वाजवण्याच्या बाबतीत नियम तोडणाऱ्यांवर कारवाई करण्याचा व त्यांना परवानगी देण्याचा अधिकार असलेल्या पोलिस यंत्रणा या प्रकाराकडे का दूर्लक्ष करत आहेत किंवा त्यांनी लक्ष घातलेच तर थातूरमातूर कारवाई करण्यापलिकडे ही यंत्रणा ठोस काही कारवाई का करत नाही असा प्रश्न सर्वसामान्यांपुढे पडला आहे.

थोर-मोठ्या महापुरूषांच्या जयंती, पुण्यतिथीच्या कार्यक्रमात, मिरवणुकीत विभस्तपणे नाचणाऱ्या तरूणाईकडे बघून सर्वसामान्यांना किळस आणि संताप येतो. मोठ्या आवाजाच्या व परिसर दणाणुन सोडणाऱ्या डीजेच्या आवाजावर चाललेला नाच व धिंगाना पाहून सर्वसामान्यांना मोठा राग येतो.

डीजेच्या आवाजामुळे लहान मुले, वृद्ध नागरिक, आजारी माणसे यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो आहे. परवाच कुर्डूवाडी भागात डीजेच्या आवाजामुळे काहींच्या कानाचे पडदे फाटून त्यांना कायमचे बहिरेपण आल्याची बातमी वर्तमानपत्रात आली आहे. डीजेच्या आवाजामुळे मानवी आरोग्याला, ध्वनी प्रदूषणाला किती मोठा धोका निर्माण झालेला आहे हे दिसते आहे, त्यामुळे डीजेबाबत आता सर्वांनीच गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मोठ्या आवाजाच्या डीजे वाजवण्यावर बंदी असूनही त्याचा काहीच उपयोग होत नाही. हे आजपर्यंत दिसले आहे. सामाजिक स्वास्थ्य बिघडू नये म्हणून मोठ्या आवाजाच्या डीजेच्या उत्पादनावरच शासनाने बंदी घातली तर ध्वनी प्रदूषण व सर्वसामान्यांचे आरोग्य अबाधित राहण्यास मदत होईल, असे आम्हाला वाटते. याबाबत समाजातील जानकारांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. कोणत्याही कार्यक्रमात डीजे वाजवायचा नाहीच, असा सर्वांनी निर्धार केला तर मोठा बदल घडून येईल. डीजे ऐवजी पारंपरिक वाद्य कार्यक्रमातून वाजवले गेले तर आपली संस्कृती टिकून राहील. हे वाजवणाऱ्याला पूर्वीचे दिवस येतील. शासनानेही कार्यक्रमात पारंपरिक वाद्य वाजवण्यासाठी प्रोत्साहन द्यायला हवे असे आम्हाला वाटते. ✻✻✻

# वेव्हज् : मनोरंजनाची सर्वसमावेशक चळवळ

मनोरंजन व्यवसायात योगदान देणाऱ्या विविध घटकांना एका मंचावर आणून त्यांना परस्पर सहकार्याची आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या देवाण-घेवाणीची संधी उपलब्ध करून देणाऱ्या वेव्हज शिखर परिषद आणि व्हेज बाजाराविषयी भारत हा मनोरंजन आणि माध्यम उद्योग जगतातला एक आघाडीचा आणि तितकाच महत्त्वाचा देश. भारतात या उद्योग क्षेत्राची प्रगतीही तितक्याच झपाट्याने होत आहे आणि त्यासोबतच या परिसंस्थेच्या अवकाशात सातत्याने होत असलेल्या बदलांसह हे क्षेत्रही तितक्याच सातत्यपूर्णतेने बहरत चालले आहे. आज या क्षेत्राकडे नीट पाहिले तर विविध व्यासपीठांवरच्या आशय निर्मितीनेही मोठी उसळी घेतल्याचे दिसते. यामागचे कारण म्हणजे देशातील वाढत्या डिजिटल प्रसारण सेवा, प्रादेशिक भाषांमधील आशय सामग्री निर्मिती आणि सातत्याने नव्या, खिळवून ठेवणाऱ्या, सर्वसमावेशकतेची जाणीव करून देणाऱ्या आशयाची वाढती मागणी करत असलेला देशातला तंत्रज्ञानस्नेही प्रेक्षक वर्ग. त्यामुळेच तर आता भारतासाठी हे क्षेत्र केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून मर्यादित राहिलेले नसून, हे भारतासाठी सांस्कृतिक अभिव्यक्ती, आर्थिक विकास आणि जागतिक पटलावर आपला प्रभाव पाडण्याचे एक सामर्थ्यशाली माध्यम झाले आहे. लवकरच मुंबईत जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषद (World Audio Visual & Entertainment Summit - WAVES) होणार आहे. येत्या १ ते ४ मे २०२५ दरम्यान महाराष्ट्रात, मुंबई इथे ही शिखर परिषद होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे भारत सरकारनेच या परिषदेचे आयोजन केले आहे. ही परिषद जागतिक पटलावर भारताच्या वाढत्या महत्त्वाचे प्रतिबिंब असलेला एक मंच ठरणार आहे आणि वेव्हज बाजार हा या शिखर परिषदेअंतर्गतचाच एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. खरे तर गेल्या अनेक दशकांपासून मी या क्षेत्रातच जगतो, वावरतो आहे. या इतक्या प्रदीर्घ काळातील माझ्या स्वत:च्या अनुभवांवरून मी एक गोष्ट खात्रीने सांगू शकतो ती म्हणजे कथात्मक मांडणीत लोकांना एकत्र आणण्याची, त्यांना प्रेरित करण्याची आणि एकुणात परिवर्तन घडवून आणण्याची मोठी ताकद असते. याच पार्श्वभूमीवर वेव्हज आणि वेव्हज बाजाराच्या माध्यमातून भारताने जागतिक मनोरंजन क्षेत्रासाठी एका व्यापक सहकार्यपूर्ण भागीदारीचे आणि सर्वसमावेशक भविष्य घडवण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे.




खरे तर वेव्हज बाजार ही ऑनलाइन बाजारपेठेसाठी आखली गेलेली एक क्रांतिकारक संकल्पना आहे. ही ऑनलाइन बाजारपेठ म्हणजे जागतिक मनोरंजन परिसंस्थेअंतर्गतचे व्यावसायिक तज्ज्ञ, उद्योग - व्यवसाय, आणि कलाकारांना परस्परांसोबत जोडून देणारे माध्यम ठरणार आहे. या बाजारपेठेअंतर्गत या क्षेत्रातील परस्पर सहकार्य सुलभ करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले गेले आहे. याद्वारे या क्षेत्रातील व्यावसायिक तज्ज्ञांना नव्या संधी शोधण्याची आणि सहकार्यपूर्ण भागीदारी स्थापित करण्याची संधी मिळणार आहे. या बाजारपेठेला माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील एक अभिनव व्यवसाय केंद्र म्हणून स्थान मिळवून देण्याचाच सरकारचा प्रयत्न आहे. भारताचे माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी २७ जानेवारी २०२५ रोजी या अभिनव बाजारपेठेचे औपचारिक उद्घाटन केले होते. आर्थिक क्षेत्रात दावोस शिखर परिषदेचे स्थान आहे, तेच मनोरंजन क्षेत्रात वेव्हज शिखर परिषदेला मिळवून देण्याचा दृष्टिकोन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला होता. त्या दृष्टीने वेव्हज बाजार महत्त्वाचे साधन ठरणार आहे.

वेव्हज बाजाराच्या अधिकृत संकेतस्थळावर आतापर्यंत, माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राशी संबंधित विविध क्षेत्रांमधील सुमारे ५५०० खरेदीदार, २००० पेक्षा जास्त विक्रेते आणि जवळपास १००० प्रकल्पांसाठी नोंदणी केली गेली आहे. भविष्यात या संकेतस्थळाला माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठीच्या आशय सामग्रीची एक सर्वसमावेशक बाजारपेठ आणि परस्पर संपर्काच्या केंद्राचे स्वरूप प्राप्त करून देणे हा सरकारचा मानस आहे. त्या दृष्टीनेच संकेतस्थळाला कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रोफाइलिंग म्हणजेच त्या त्या व्यक्तींची व्यावसायिक ओळख करून देण्याची तसेच मागणीनुसार जुळवणी करून देण्याच्या तंत्रज्ञानाचीही जोड दिली गेली आहे. या माध्यमातून ऑनलाइन संकल्पना मांडण्याचे सत्र, ऑनलाइन बीटूबी बैठका (विविध व्यावसायिक प्रतिनिधींच्या बैठका), वेबिनार या आणि अशाच प्रकारच्या इतर महत्त्वाच्या सत्रांचेही आयोजन केले जाणार आहे.

ही बाजारपेठ म्हणजे माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राच्या अवकाशातील चित्रपट, दूरचित्रवाणी, ॲनिमेशन, गेमिंग, जाहिरात, वर्धित वास्तव (एक्स्टेंडेड रिॲलिटी), संगीत, ध्वनी संयोजन, नभोवाणी या आणि अशा विविध क्षेत्रांमधील भागधारकांना एकत्र आणणारे एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. हे व्यासपीठ विक्रेते आणि खरेदीदारांतील दुवा ठरेल आणि त्याद्वारे व्यावसायिकांना आपली कौशल्ये सुलभतेने सादर करण्याची, त्यांच्या संभाव्य ग्राहकांसोबत थेट संपर्क साधण्याची आणि उपयुक्त सहकार्यपूर्ण भागीदारीची संधी उपलब्ध करून देत राहील.

एखादा चित्रपट दिग्दर्शक आपल्या चित्रपटासाठी निर्मिती भागीदाराच्या शोधात असेल, एखादा जाहिरातदार योग्य व्यासपीठाच्या शोधात असेल, एखादा गेम डेव्हलपर गुंतवणूकदाराच्या शोधात असेल किंवा एखादा कलाकार आपल्या कलाकृतींना जागतिक स्तरावरील प्रेक्षकांसमोर सादर करू इच्छित असेल, तर अशा सर्वांसाठी वेव्हज बाजारपेठेचा हा मंच म्हणजे परस्पर संपर्क, सहकार्य आणि व्यवसायवृद्धीचे बहुआयामी व्यासपीठ उपलब्ध करून देणारी मोठी जागा किंवा बाजारपेठ असणार आहे.

एका अर्थाने वेव्हज बाजार ही एकप्रकारची समन्वित बीटूबी बैठकांची अभिनव बाजारपेठ आहे, जिने जागतिक मनोरंज क्षेत्रातील परस्पर संपर्क व्यवस्था, परस्पर सहकार्यपूर्ण भागीदारी व्यवस्था, आणि विकासाचा संपूर्ण चेहरामोहरा अगदी क्रांतिकारकरीत्या बदलला आहे. या बाजारपेठेने चित्रपट, दूरचित्रवाणी, संगीत, गेमिंग, ॲनिमेशन, जाहिरात तसेच वर्धित वास्तव (एक्स), आभासी वास्तव (व्हीआर) यांसारख्या जिवंत अनुभूती देणाऱ्या तंत्रज्ञानाशी संबंधित तज्ज्ञ

(उर्वरित पान ३ वर)

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**
✻ वर्ष ०८ ✻ अंक ५३ ✻ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. २८ एप्रिल २०२५ ✻ किंमत : २ रू.

# व्यायम शिबीर व संस्कार वर्ग चे आयोजन केल्यामुळे देशाचे भविष्य घडविणारे शिबीर-प्रा.बाबासाहेब देशमुख



परळी वैजनाथ (बातमीदार):- गेल्या ३५ वर्षापासून श्री हनुमान व्यायम शाळा व वैद्यनाथ बँक यांच्या संयुक्त विद्यमाने व श्री वैद्यनाथ देवळ कमिटीच्या सहकार्याने आयोजित केलेल्या उन्हाळी व्यायम शिबीर व संस्कार वर्ग शिबीराचे आयोजिन केल्यामुळे देशाचे भविष्य घडविणारे शिबीर म्हणे वावगे ठरणार नाही असे प्रतिपादन श्री वैद्यनाथ देवळ कमिटीचे सचिव प्रा.बाबासाहेब देशमुख यांनी केले.व्यायम शिबीर व संस्कार वर्गाचे मान्यवरांच्याहस्ते उद्घाटन हनुमान व्यायाम शाळा येथे झाले या प्रसंगी प्रा.बाबासाहेब देशमुख बोलत होते. या प्रसंगी ते म्हणाले की, आजचा विद्यार्थी हा देशाचे भविष्य घडविणार आहे. त्यासाठी तंदुरस्त व संस्कार होणे गरजेचे आहे. त्या दुष्टिकोणातूनच उन्हाळी व्यायम शिबीर व संस्कार वर्गाचे आयोजन केले जात आहे.

या शिबीराचे उद्घाटनाचे अध्यक्षस्थानी वैद्यनाथ बँकेचे संचालक प्राध्यापक महेश्वर निर्मळे, प्रमुख पाहुणे प्रा.डी.जे.वाघमारे, वैद्यनाथ देवळ कमिटीचे विश्वस्थ नागनाथराव देशमुख, रघुवीर देशमुख माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी माजी नगराध्यक्ष वैजनाथराव जगतकर सामाजिक कार्यकर्ते विलासराव ताटे या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते याप्रसंगी बाजीराव धर्माधिकारी यांनी हनुमान व्यायाम शाळा शिबिरासाठी सहकार्य करण्याचे कबूल केले हनुमान व्यायाम शाळेचे प्रमुख मार्गदर्शक दत्ताप्पा ईटके गुरूजी, यांनी बोलताना म्हणाले की योगासन, कुस्ती, मल्लखांब, लाठी काठी, जलतरण, सूर्यनमस्कार, दंड-बैठका यासह एकूण २५ भारतीय व्यायामाचे प्रकार व्यायाम शिबीर आणि संस्कार वर्गात विद्यार्थ्यांना शिकवले जातील. परळीतील एकूण ५० गुरुजन आणि असंख्य स्वयंसेवक संपूर्ण शिबीर कालावधीमध्ये अक्षरशः वाहून घेतात उन्हाळी शिबिर २२ एप्रिल ते २५ मे पर्यंत पहाटे पाच ते आठ सायंकाळी पाच ते आठ असे चालेल ,या वेळी माजी उपनगराध्यक्ष सुरेश टाक, हनुमान व्यायम शाळेचे सचिव सुभाष नाणेकर ज्येष्ठ संचालक देविदास कावरे, नारायणआप्पा गोपनपाळे समर्थ शिक्षक प्रसारक मंडळाचे सचिव प्रभाकर इटके हनुमान व्यायाम शाळेचे अध्यक्ष वैजनाथ इटके संचालक चंद्रकातअप्पा समशेटे, महादेवअप्पा फडकरी, माजी मुख्याध्यापक अमर देशमुख सर नरसिंग देशमुख ज्येष्ठ पत्रकार आनंत भातगळे सर प्रभूआप्पा साखरे , पत्रकार बालाजी ढगे उपस्थितीत होते. या प्रसंगी मान्यवरांचे स्वागत क्रिडा शिक्षक विजय मुंडे, विलास आरगडे सर योग शिक्षक बाळासाहेब कराड, , सूर्यकांत टेकाळे, गडदे सर ॲड सायस मुंडे माजी सरपंच शिवशंकर कराड, मुद्रा लोन बीड जिल्हा समिती सदस्य सुशील हरंगुळे विकास प्रतिष्ठान सहसचिव विकास हालगे, अमोल बुरकुल महात्मा हत्ते गुरुजी, दिंगाबर नागराळे, विक्रम स्वामी, अनिकेत तीळकरी, गोल्ड मेडलिस्ट सोमेंद्र शास्त्री, मुकुंद कुलकर्णी आदित्य नागराळे बाळू भातांगळे शैलेश पांडे आधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्राध्यापक उमाकांत कुरे तर आभार माजी नगरसेवक महादेव ईटके यांनी केले. ***

# मराठवाडा अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटीत १५ कोटींचा अपहार

माजलगाव (बातमीदार):- संस्थेत जमा झालेल्या ठेवींच्या नोंदी व कर्ज रकमेच्या नोंदी संगणकावर न करता बनावट दस्तऐवज करून ठेवीदारांना ठेऊ पावत्या व कर्जदारांना बेबाकी प्रमाणपत्र देऊन मराठवाडा अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटीचे संचालक मंडळ व कर्मचारी, धनदांडगे मालमत्ता खरीददार व या बँकेच्या लेखापरीक्षकसह २४ जनांवर माजलगाव शहर पोलीस ठाण्यात लेखापरीक्षा वर्ग २ त्यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माजलगाव शहरातील मोंढा भागात असलेल्या मराठवाडा अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटीचे १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२३ चे फेर लेखापरिक्षण विशेष लेखा परीक्षक वर्ग २ सहकारी संस्थेचे सतीश काकासाहेब पोकळे यांनी करून याचा अहवाल वरिष्ठांना सादर करण्यात आला. या अहवालात असे नमुद केले आहे की , समृद्ध मराठवाडा मल्टीस्टेट व्हिकल सर्विसेस को-ऑप सोसायटी या नावाने कॅश क्रेडिट ९ कोटी ३९ लाख ७० हजार ८२१, मुदत ठेव मधील अपहार श्रीराम मच्छिंद्र बहिर ६ लाख, सुहास संपत जाधवर ३० लाख, कर्ज वितरणातील अपहार व गैरव्यवहार ५ कोटी ५० लाख रूपये केला.असा सर्व मिळुन १५ कोटी २५ लाग ७० हजार ८२१ रूपयांचा समावेश आहे.

या अपहारास जबाबदार असलेल्या २४ जनाबाबत तक्रारीत उल्लेख करण्यात आला आहे. या प्रकरणी मराठवाडा अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटीचे अध्यक्ष सतीश गंगाधर सावंत, गणेश त्रिंबकराव शेळके , महिंद्र मनमोहन मानधने, विश्वंभर पांडुरंग शिंदे, शिवाजी लक्ष्मण गडदे, अनिता पृथ्वीराज होते, सुनिता भास्कर्राव खटले , सुमित बाळकृष्ण भावसार, योगेश एकनाथ घुले, पोपट शिवाजी आवाड ( वरील सर्व संचालक), मुख्य कार्यकारी अधिकारी किशोरी सतीश सावंत व गजानन विठ्ठलराव डासाळकर, व्यवस्थापक अमोल सुखदेव अंधारे, रविकिरण मधुकर दहिवाळ, भाग्यश्री गगानन डासाळकर, गुलाबाई रूपाजी अंधारे, अंजली अमोल अंधारे, अशोक आता गिरी (वरील सर्व संस्थेचे कर्जदार), लेखापरीक्षक एस.बी.गायकवाड व किरण कमलाकर सावजी, समर्थ मराठवाडा मल्टीस्टेट व्हिकल सर्विसेस को-ऑप सोसायटी लि. माजलगाव या संस्थेचे संचालक मंडळ यांचा समावेश आहे. माजलगाव येथील धनदांडगे व होलसेल व्यापारी धनराज प्रेमराज बंब व विजयराज हेमराज बंब या दोघांनी जिल्हा बीड संस्थेत तारण असलेली मालमत्ता बनावट दस्ताऐवजा आधारे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी संगनमत करून करून संस्थेच्या अनेक मालमत्ता खरेदी केल्याचे उघड झाले म्हणून या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ***

# न्यायायालयीन शिपाई निलंबित

बीड, (जि.मा.का.):- बीड न्यायालयातील शिपाई शंकर अंबादास किरवले याने दि. २१ एप्रिल २०२५ रोजी बीड येथील बसस्थानकात महिलांकडे पाहून अश्लिल कृत्य केल्याबाबतचे वृत्त विविध वर्तमानपत्रामध्ये प्रकाशित झाले होते. शंकर अंबादास किरवले, शिपाई यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन शिवाजी नगर बीड येथे गु.र.न २३२/२०२५ कलम ७९,७५ (१) (४) भा.न्या संहिता २०२३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून सदर गुन्हयातील प्रथम खबरी अहवाल व इतर कागदपत्रे जिल्हा न्यायालयास प्राप्त झाली असून शंकर अंबादास किरवले याचे कृत्य हे अशोभनिय असल्यामुळे शंकर अंबादास किरवले, शिपाई याला तात्काळ निलंबित करण्यात आले असून त्याच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्यात येत आहे, असे अधिकृत सुत्राकडून समजले. ***

# युपीएससीत यश मिळविलेल्या अक्षयचा भगवानबाबा विद्यालय पांगरी कँप येथे सत्कार



परळी वैजनाथ (बातमीदार):- पांगरी कँप येथील श्री संत भगवानबाबा प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचा माजी विद्यार्थी अक्षय मुंडे याने युपीएससीची परीक्षेत ६९९ रँक घेत मिळवले यश मिळविल्याबद्दल शाळेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष फुलचंदराव कराड यांच्या मार्गदर्शनाखाली सत्कार करण्यात आला. अक्षय च्या घरची परिस्थिती अत्यंत बेताची. त्यात वडिलांचे छत्र बालपणीच हरवलेले अशा प्रतिकुल परिस्थितीत परळी तालुक्यातील पांगरी चा अक्षय संभाजी मुंडे हा गावातील संत भगवानबाबा विद्यालयातून दहावी उत्तीर्ण झाला. बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर त्याने बीडीएस ही वैद्यकीय शाखेची पदवी घेतली. आपल्या आईचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी स्पर्धा परीक्षांसाठी तयारी सुरू केली. पुणे येथून दोन वर्षांपूर्वी तो नवी दिल्ली येथे गेला व स्पर्धा परीक्षांसाठी त्या ठिकाणी योग्य असे मार्गदर्शन मिळवत त्याने प्रचंड मेहनत सुरू ठेवली. युपीएससीच्या परीक्षेत त्याने ६९९ वी रँक मिळवत विजयाची माळ खेचून आणली. त्याच्या ह्या उत्तुंग यशाबद्दल त्याचा श्री संत भगवानबाबा प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात शुक्रवार दि.२५ एप्रिल रोजी सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय कोपनर, शिक्षक रंगनाथ घुले, सुर्यकांत होळंबे, संदीपान कांदे, विष्णु मुंडे, गोविंद कराड, सुरेश मुंडे, बालासाहेब जोगदंड, नाथराव केंद्रे, संभाजी केंद्रे, भाऊसाहेब मुंडे, सचिन पवार, सिध्दार्थ बनसोडे, रघुनाथ चप्पे, धनराज चाटे, धम्मपाल रोडे, रुक्मिण शेप, बापु मुंडे, सचिन बारगजे आदी उपस्थित होते. ***

(पान २ वरुन).........**वेव्हज् : मनोरंजनाची सर्वसमावेशक चळवळ**

व्यावसायिकांना एकत्र आणणारा मंच उपलब्ध करून दिला आहे. आणि याद्वारे विविध सर्जनशील क्षेत्रांसाठीच्या आशय सामग्रीचे सूचीकरण, त्याचा शोध आणि संबंधित व्यवहारांसाठीचाही एक व्यापक मंच उपलब्ध झाला आहे. चित्रपट वितरणासाठीचा मंचाच्या शोधात असलेले निर्माते, नव्या संकल्पना मांडू पाहणारे गेम डेव्हलपर किंवा लायसन्सिंग संधींच्या शोधात असलेले साऊंड डिझायनर अशा सगळ्यांसाठी वर्गवारीनुसार सूचीकरण, सुरक्षितपणे सादरीकरणे पाहण्याची दालने आणि संपर्क व्यवस्था उपलब्ध करून देत ही संपूर्ण प्रक्रिया सुलभ करणारी बाजारपेठ म्हणून वेव्हज बाजार उदयाला येणार आहे.

या बाजारपेठेच्या माध्यमातून भौगोलिक मर्यादांच्या पलीकडे जात विक्रेते आणि खरेदीदारांना त्यांच्यासाठीचा योग्य भागीदार आणि संधी शोधण्याच्या दृष्टीने सक्षम करणाऱ्या सुविधांचा अंतर्भाव केला आहे. चित्रपट स्टुडिओ, ॲनिमेशन हाऊस, पॉडकास्ट निर्माते, मार्केटिंग यंत्रणा यांसारख्या विक्रेत्यांना आपल्या सेवा आणि त्यांच्याकडची आशय सामग्री जागतिक गुंतवणूकदार, वितरक आणि भागीदारांसमोर सादर करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. दुसरीकडे खरेदीदारांसाठीदेखील उच्च गुणवत्तेचे, आधुनिक काळाशी सुसंगत प्रकल्प या बाजारपेठेमुळे उपलब्ध होऊ लागले आहेत. त्याच वेळी गुंतवणूकदारांसाठीदेखील सहनिर्मितीच्या करारांची आणि व्यापक व्यावसायिक संधींची दारे खुली झाली आहेत. इथे आवर्जून उल्लेख करायला हवी अशी गोष्ट म्हणजे या व्यासपीठाला या उद्योग क्षेत्राशी संबंधित विशिष्ट उपक्रम, सादरीकरणे पाहण्याची दालने, गुंतवणूकदारांबरोबरच्या बैठका - चर्चा आणि कलाकृतींच्या थेट प्रक्षेपण सत्रांसारख्या लाइव्ह स्क्रीनिंगसारख्या उपक्रमांशी जोडले गेले आहे, यामुळे या व्यासपीठाच्या माध्यमातून केवळ आभासी संवादाच्या पलीकडे जात खऱ्या अर्थाने उपयुक्त असलेले करार आणि व्यवहार प्रत्यक्षात साकारले जातील याचीच सुनिश्चिती झाली आहे.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे येत्या १ ते ४ मे २०२५ दरम्यान मुंबईत वांद्रे-कुर्ला संकुलात वेव्हज शिखर परिषद होणार असून त्यावेळी हा वेव्हज बाजारही साकारला जाणार आहे. यानिमित्ताने उपलब्ध करून दिलेल्या डिजिटल बाजारपेठेवर नोंदणी केलेल्या काही निवडक प्रतिनिधींना या बाजारपेठेत आपल्या संकल्पना मांडण्याची, या उद्योग क्षेत्रातील विविध घटकांसोबत संपर्क प्रस्थापित करण्याची, आघाडीच्या भागधारकांसोबत प्रत्यक्ष करार आणि व्यवहार पूर्णत्वाला नेण्याची मोठी संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. अभिनव दृष्टिकोनामुळे वेव्हज बाजार केवळ एक व्यासपीठ म्हणून मर्यादित राहिलेले नाही, तर ते अधिक स्मार्ट, परस्परांशी अधिक जोडलेले आणि जागतिक पातळीवरील सर्वसमावेशक मनोरंजन क्षेत्राच्या दिशेने सुरू झालेली चळवळच ठरले आहे.

एक कलाकार म्हणून, आम्ही कायमच आव्हानात्मक, प्रेरणादायी आणि चौकटीपलीकडे जाऊन विचार करायला लावणाऱ्या अवकाशाच्या शोधात असतो. वेव्हज हा अशाच प्रकारच्या अवकाशाच्या निर्मितीचा प्रयत्न आहे. दूरदृष्टीने सुरू केलेल्या या वाटचालीचा आपणही एक भाग असल्याचा मला खरोखरच अभिमान वाटतो. ही परिषद आपल्या परस्परांशी संपर्काच्या, कलाकृतींच्या निर्मितीच्या आणि मांडणीच्या पद्धतींमध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणेल. हा बदल केवळ भारतापुरता मर्यादित नसेल तर त्याचा प्रभाव अवघ्या जगात दिसेल. ही परिषद म्हणजे भारतासाठीचा 'लगान' क्षण आहे. जगभरातील माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठी एकतेचा, धैर्याचा आणि एका अशा दृष्टिकोनाचा क्षण आहे, ज्याचा प्रतिध्वनी आपल्या सीमांच्याही पलीकडे ऐकू येत राहील.

**लेखक : आमिर खान,**
अभिनेता आणि निर्माते
(सौजन्य: पी.आय.बी., मुंबई)